# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२०                                        दि. ४ मार्च,२०२०

जळगाव दि.४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातर्फे मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात “डॉ.बाबासाहेबर आंबेडकर यांच्या पत्रकारितेची १०० वर्ष” या विषयावर बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेसाठी शोध निबंध मागविण्यात आले आहे.

परिषदेसाठी "डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता" हा मुख्य विषय (थीम) असून "संपादकीय लेखन", “संपादकीय विषय", “वृत्तपत्रातील लिखाण शैली", “वृत्तपत्रातील भाषा शैली", “डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची वृत्तपत्रे आणि सामाजिक न्याय", “डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता आणि सामाजिक बदल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि मराठी पत्रकारिता, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेतील साहित्य” असे उपविषय शोधनिबंधासाठी आहेत.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी “मूकनायक” हे पाक्षिक सुरु करून वृत्तपत्र क्षेत्रात पदार्पण केले होते. त्याला नुकतीच १०० वर्ष पूर्ण झाली आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील सामाजिक कार्यामध्ये पत्रकारिता हे क्षेत्र खूप महत्वाचे ठरले आहे. त्यांच्या पत्रकारितेमधील विविध पैलूंसह दुर्मिळ लेखन समोर यावे हा परिषदेमागील उद्देश असून विद्यार्थी, शिक्षक, संशोधक व अभ्यासकांना माहिती मिळावी. तसेच आजच्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये डिजीटल पत्रकारितेच्या काळात त्यांच्या पत्रकारितेचे महत्व अधोरेखीत व्हावे यासाठी बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे.

परिषदेसाठी विद्यार्थी, शिक्षक, संशोधक यांनी वरील विषयावर शोधनिबंध mcjkbcnmu@gmail.com या ई-मेल आयडीवर दि.२० मार्च २०२० पर्यंत पाठवावेत. अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी. अशी माहिती विभागप्रमुख तथा परिषदेचे समन्वयक डॉ.सुधीर भटकर, सहसमन्वयक डॉ.विनोद निताळे यांनी कळविली आहे.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

आपल्या लोकप्रिय दैनिकात उपरोक्त बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दि.४ मार्च,२०२०

जळगाव दि.४ ( ) कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील मनस्विनी समुहाकडून महिलांसाठी “महिला सक्षमीकरण, महिलांचा विकास, आरोग्य, ताणतणाव व योगा” या विषयावर डॉ.लिना चौधरी यांचे व्याख्यान गुरुवार दि.५ मार्च रोजी आयोजित करण्यात आले आहे.

गुरुवारी ५ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील राहतील.जागतिक महिला दिनानिमित्त

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकात उपरोक्त बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी